# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २९.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— सराफा दुकानात चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी राकेश भाऊरावजी धार्मिक वय ४४ वर्षे रा. प्लॉट क्र. ४३, कुसुबा निवास, बापू पाटील वाडी, सरस्वती विद्यालय मागे, पाचपावली, नागपुर यांचे पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, दुकान क्र. १०८१/३३, सुजाता नगर, शनि मंदीर रोड, नागपुर येथे विहांत ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान आहे. दिनांक ०६.०६.२०२६ चे १३.३० वा. ते १३.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी हे दुकानात हजर असतांना, त्यांचे दुकानात वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयोगटातील दोन अनोळखी इसमांनी येऊन 'सोन्याची बाली पाहिजे' असे म्हणून, फिर्यादी यांनी आरोपीतांना बाली दाखवित असता, फिर्यादीची नजर चुकवून, दुकानातील स्टीलच्या डब्यातील एका प्लास्टीक पाकीटात ठेवलेल्या सोन्याच्या बाली ३८ नग वजनी २२.४० ग्राम कि. २,५०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अनोळखी दोन आरोपीतांविरूध्द कलम ३०३(३),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन आणि गुप्त बातमीदार मार्फतीने माहितीवरून आरोपी क्र. १) अफसर अली वल्द सरताज अली वय ४३ वर्ष रा. बाबा मस्तानशाह वार्ड, भंडारा ह.मु. सिंधी लाईन, बजाज मॉल मागे, आगलावेच्या घरी किरायाने, लाखनी जि. भंडारा यास ताब्यात घेऊन वर नमुद गुन्हयाबाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे जाहीर अली उर्फ अन्ना नावाचा ईसम वय अंदाजे ५० वर्ष रा. वरोरा जि. चंद्रपूर याचेसह संगनमताने केल्याचे कबुली दिली. आरोपीस मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता, आरोपी क्र. २) अमिनुर रहमान खदारखा खांडेकर वय ५३ वर्ष रा. हाऊस क्र. ८२५, सालेबर्डी रोड, कारधा जि. भंडारा याचेकडे ठेवल्याचे सांगितले. आरोपी क्र. २ याचे ताब्यातून कानातील सोन्याचे दागिने वजनी ८.५७ ग्राम व सोन्याची लगड वजनी ९.५७ ग्राम असा एकूण कि. २,१७,३२०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयामध्ये कलम ३१७(२) भा.न्या.सं अन्वये वाढ करण्यात आली आहे. आरोपी क्र. १ व २ यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग श्रीमती विनीता साहू, मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ श्री. राहुल मदने, मा. सहायक पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शनात वपोनि. अनिरुध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघान, पोउपनि. रणजीत माजगावकर, पोहवा. विनोद समदुरे, प्रविण वावरकर, फहीम खान, रोमेश मेनेवार, पोअं. गगन यादव, शहनवाज मिर्झा व

मपोअं. प्रिती थोरात यांनी परिमंडळीय सायबर सेलचे नापोअं महेंद्र सेलोकार यांचे विशेष सहकार्याने केली आहे.




**२) बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २८.०६.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, न्यु मनिषनगर, डीपी रोड, भारत पेट्रोल पंपजवळील अंजना सावजी रेस्टारेंटचे बाजुला, एक इसम हातात शस्त्र घेऊन धुमधाम करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात चाकू घेऊन धुमधाम करतांना दिसून आला. त्यास ताब्यात घेऊन निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव संदीप भारत वर्मा वय २६ वर्षे रा. महाकाली नगर झोपडपट्टी, शितला माता मंदीरजवळ, बेलतराडी नागपूर असे सांगीतले. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२५, दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनात वपोनि. रितेश आहेर, पोउपनि. किशोर मालोकर व त्यांचे पथकाने केली.

## (गुन्हे)

**१) पोलीस ठाणे नंदनवन :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०६.२०२६ चे २१.५० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, नंदनवन झोपडपट्टी परिसरात ज्ञानविकास शाळेमागे अंधारात एक इसम संशयीतरित्या बसलेला दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळू

लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ईशांत सुनिल कदम वय १९ वर्षे रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. २, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत जिन्सपॅन्टमध्ये खोसलेला एक लोखंडी चाकू किंमती अं. ५००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी चाकू बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. आशिष तितरमारे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. शशिकांत नागरगोजे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी ऋषिकेश सत्यजीत वाचासुंदर वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. १३, योगक्षेम ले आऊट, स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर यांचे पोलीस ठाणे बजाजनगर हद्यीत, प्लॉट क्र. ४३, सुरेंद्रनगर येथे रॉयल ब्ल्यु रिसोर्ट प्राय. लिमीटेड नावाचे ऑफीस आहे. ऑफीस मार्फतीने ताडोबा येथील वन्यविलास रिसोर्ट, क्लिन ओ क्लॉक या कंपनीचे हाऊस किपींगचे काम केले जाते. दिनांक २७.०६.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक २९.०६.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी आपले ऑफीस बंद ठेवले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे ऑफीसचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, ऑफीसमधील रोख ६०,०००/—रू. तसेच, एचपी कंपनीचे ०२ आणि लेनोओ कंपनीचा ०१ असे ०३ लॅपटॉप व गॅलेक्सी सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण किंमती १,३७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. अतुल आडे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कोराडी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी विद्याभारती सिंग राकेश पटेल वय ३३ वर्ष रा. प्लॉट क्र. २७, पद्मावती नगर, गोधनी रोड, कोराडी नागपूर हे शेअर मार्केट ट्रेडींगचा व्यवसाय करतात. दिनांक ०१.०४.२०२२ ते २३.१०.२०२४ दरम्यान फिर्यादी यांनी आरोपी क्र. १) नबाब मोहसीन खान वय ३८ वर्ष रा. रुईकर रोड, कॉग्रेस भवन मागे, गांधीबाग गणेशपेठ, नागपूर २) अल्ताफ अकरम खान वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. १०१, श्री राधे हेरीटेज, तिरुपती बॅक जवळ, अहबाब कॉलनी, जाफरनगर, गिट्टीखदान, नागपूर यांचे मौजा गोधनी, पहनं. १२, खसरा क्र. ९७ मधील गितांजली हाऊसिंग सोसायटी चे प्लॉट क्र. १४,१५,१६,३३,३४,३५,३६ व ३७ असे आठ प्लॉट फिर्यादीने विकत घेतले होते. आरोपीतांनी संगणमताने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, त्यांचेकडून नमुद प्लॉटची रक्कम चेक,ऑनलाईन तथा रोख स्वरुपात एकूण ६०,००,०००/— रुपये घेऊनही फिर्यादी यांना विक्रीपत्र करुन दिले नाही. फिर्यादी यांनी आरोपीतांना प्लॉटचे विक्रीपत्र करुन मागितले असता, आरोपींनी टाळाटाळ करुन विक्रीपत्र करुन देण्यास नकार दिला. आरोपींनी संगनमताने फिर्यादीकडून वेळोवेळी प्लॉटची रक्कम घेऊन, त्यांना कोणतेही कागदपत्र तयार करुन न देता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन, त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. महेंद्र चोपडे यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :–** आशिष सत्यभान विश्वकर्मा वय ३० वर्षे रा. आदिवासी सोसायटी, प्लॉट क्र. ३४, मनिषनगर, बेलतरोडी, नागपूर हा मनोरुग्ण असून दिनांक २८.०६.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी खेळायला जातो असे सांगून घरुन गेला. आजपावेतो घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, डोक्याचे केस–काळे, डोळे–काळे, अंगात–निळया रंगाची हॉफ टिशर्ट व आकाशी रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** श्रीमती अंतकला योगराज वासनिक वय ६५ वर्षे रा. मानवता नगर, कौशिक किराणा स्टोअर्स जवळ, टिव्ही टॉवर, गिट्टीखदान, नागपूर हया दिनांक १८.०५.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काही न सांगता घरुन निघून गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची– ६ फुट, डोक्याचे केस–पांढरे व बारीक, डोळे–काळे, अंगात–गुलाबी रंगाची साडी घातलेली असून डोक्यावर पिवळा फेटा बांधलेला आहे. भाषा–मराठी बोलतात. ओळखचिन्ह– दोन्ही हातावर योगराज आणि राहुल गोंदलेले आहे.



आशिष



श्रीमती अंतकला

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**